पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ११ /२०१९
दिनांक : ०४/०१/२०१९

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०९/०१/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०९/०१/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १६**

**दिनांक : ०९/०१/२०१९** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **०९/०१/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक **२१/१२/२०१८, २७/१२/२०१८ व ०३/०१/२०१८** रोजी झालेल्या विशेष सभेचा (**कार्यपत्रिका क्र.१४**) चा सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक **०३/०१/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र.१५**) चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. क्रपीसीसी।३०९६।१८०१।सीआर-२६१।नवि-२२, दि.११।०९।१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र.टिमपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजुर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुन:प्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरीत विकास योजना मंजुर असुन शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१२/१६०/प्र.क्र.५८/१२/पुनर्बांधनी क्र.२७/१२/ईपी मंजुरी/नवि-१३ दि. ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरीत भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. सदर मंजुर विकास योजनेत मौजे चोविसावाडी येथील स.नं.१७ व १८ पैकी मध्ये आ.क्र.२/११ अग्निशमन केंद्र (Fire Station) हे ४० आर क्षेत्राचे आरक्षण आरक्षित केलेले आहे. संदर्भीय पत्रान्वये कार्यकारी अभियंता स्थापत्य इ प्रभाग यांनी मौजे चोविसावाडी येथील सदर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील स.नं.१७ पै व १८ पै मधील प्रस्तावित आ.क्र.२/११ अग्निशमन केंद्र (Fire Station) या आरक्षणाकरिता मनपाचे ताब्यात न आलेले उर्वरित सुमारे २० आर क्षेत्राचे भुसंपादन करुन जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेबाबत कळविले आहे. सबब सदरचे आरक्षणाकरिता खाजगी जमिनीचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी मौजे चोविसावाडी येथील स.नं.१७ पै व १८ पै मधील

प्रस्तावित आ.क्र.२/११ अग्निशमन केंद्र (Fire Station) या प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक ०९/०१/२०१९ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील १८.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा.नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगररसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक ०९/०१/२०१९ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील १२.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगररसदस्य व नागरिंकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.७३ ते ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक ०९/०१/२०१९ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.३) मौजे वाकड येथील प्राधिकरणाचे मंजुर विकास योजनेनुसार व पिंपरी महानगरपालिकेचे नियोजन नियंत्रण कक्षामध्ये सन १९९८ मध्ये समाविष्ट झालेल्या स.नं. २१० पैकी यामध्ये २४ मी. रूंद रस्ता प्रस्तावित आहे. सदरच्या २४ मी. रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत स.नं.२१०/३ वाकड येथे सुमारे ९५ मी. लाबींचा असून उर्वरित रस्ता प्राधिकरणाचे हद्दीत आहे. मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ पैकी १५९६० चौ.मी. क्षेत्रामध्ये म्हातोबानगर ही घोषित झोपडपट्टी असून त्याचे पुनर्वसन करणेचे काम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, सेनापती बापट मार्ग, पुणे यांचे निर्देशनाखाली चालु आहे. म्हातोबानगर झोपडपट्टी, वाकड–डांगे चौक २४ मी. रूंद रस्त्यावर असून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकास योजना नकाशानुसार २४ मी. रस्ता प्रस्तावित दाखविला आहे. सदरचा रस्ता वेणुनगर इमारतीच्या बांधकामामुळे बाधित होत असल्यामुळे प्रत्यक्षात भविष्यात अस्तित्वात येऊ शकणार नाही. त्यामुळे वाकड-डांगे चौक २४ मी. रुंद रस्ता यावरून स.नं. २१०/३ मधील २४ मी. रूंद रस्ता रद्द करणे उचित होईल. आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे विधानभवन पुणे – ४११ ००१ यांचे पत्र क्र.सआ/भु.सं./तीन ५५०/१९९५ पुणे दि.१४/१०/१९९५ रोजीचे आदेशान्वये मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ पैकी मधील २४ मी. बाधित सुमारे ९५ मी. ने बाधित क्षेत्र प्राधिकरणाचे नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण हद्दीत येत असून सदर रस्ता वगळणेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून कार्यवाही करावी लागेल. उपरोक्त बाबी पहाता प्राधिकरणाच्या नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण हद्दीमध्ये ९५ मी. लाबींचा रस्ता महानगरपालिकेच्या हद्दीत येत आहे. सदर रस्त्याचे जागेमध्ये म्हातोबानगर झोपडपट्टी आहे व त्याचे पुनर्वसन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सेनापती बापट मार्ग, पुणे यांच्या नियोजनाद्वारे चालु आहे. प्राधिकरणाने त्यांच्या सेक्टर ४० च्या मंजूर रेखांकन नकाशा (लेआऊट) मध्ये सदर ९५ मी. लांबीचा स.नं.२१० वाकड मधील प्रस्तावित रस्ता दाखविल्याचे दिसून येत नाही.तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना पाठविलेले पत्र दि. ०८/०५/२०१८ द्वारे "प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील अर्जदार यांनी नमूद केलेला २४ मी. रूंदीचा रस्ता हा मौजे वाकड स.नं.१७८ व स.नं.२१० मध्ये दर्शविलेला असून स.नं.१७८ मध्ये प्राधिकरणाने राबविलेल्या गृहयोजनेमुळे सदर रस्त्याची आखणी ही विकास योजनेनुसार करणे शक्य नाही. स.नं.१७८ मधील सदर २४ मी. रूंद रस्ता हा कॅनॉलच्या दोन्ही बाजुंनी १२ मी. रूंद

दर्शविलेला आहे व तो विकसित आहे. प्राधिकरण हद्दी बाहेरील मौजे वाकड स.नं.२१० भाग मधील मंजूर विकास योजनेतील २४ मी. रूंद रस्त्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे." असे कळविले आहे. तरी सदरचा प्रस्तावित २४ मी. रस्ता रद्द करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावा लागेल. उपरोक्त विषयांकित प्रकरणी सदरचा २४.० मी. रस्ता रद्द करणेबाबतचा फेरबदल प्रस्ताव म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक ०९/०१/२०१९ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**



(उल्हास बबनराव जगताप)

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ११ /२०१९
दिनांक : ०४/०१/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.